MHKO100003242022

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९/२०२२</u>**

बसाप्पा रामू हालगडगी.
//विरुध्द//
शिवराम रामू हालगडगी - म.वा. वगैरे.

**<u>निशाणी क्र. १९ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्जदारतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२ प्रमाणे दरम्यानचे उत्पन्नाची चौकशी होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर कामी अर्जदार यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१५ येथे दिनांक ०१/०४/२०२३ अन्वये दाखल केले आहे. त्यानंतर सदर प्रकरण निशाणी क्र.१५ चे उलटतपासावर ठेवण्यात आले. वि.प. यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक १७/०१/२०२४ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत वि.प. यांनी असे कारण नमुद केले आहे की, त्यांनी सदर कामी नि.१४ येथे आपले म्हणणे यापूर्वी कामात सादर केलेले आहे. तथापि, दरम्यानचे काळात प्रस्तुत वि.प. राजू शिवराम हालगडगी हे आजारी पडलेने त्यांना अर्जदार यांचा उलटतपास घेणेबाबत आवश्यक ती माहिती आपल्या वकीलांना वेळेत देता आली नाही. त्यामुळे, त्यांना अर्जदार यांचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेले आहे. प्रकरणाची परिस्थिती पाहता झालेला विलंब व त्याकरीता दिलेले कारण हे संयुक्तीक वाटत नाही. परंतु, अर्जाचे स्वरुप पाहता अर्ज गुणदोषावर निकाली काढणेकरीता वि.प. यांना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. वि.प. यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे अर्जदार यांचे झालेले नुकसान याकरीता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. तसेच, खर्चाची रक्कम ठरविताना नि.१७ वरील आदेशानुसार वि.प. यांना झालेली खर्चाची रक्कम रु.३००/- ही देखील विचारात घेणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम वि.प. यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.08.12 17:33:54 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १२/०८/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 12/08/2024 |
| Order signed by P.O. on | 12/08/2024 |
| Order uploaded on | 12/08/2024 |